PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 4

# आदिवासी लोकसाहीत्यातून व्यक्त झालेल्या 'कोलाम' जमातीच्या सांस्कृतिक वेगळेपणाचा शोध'

**डॉ. गजानन मुंधे**
मराठी विभाग प्रमुख,
आप्पास्वामी महा. शेंदुरजना (आढाव)
ता. मानोरा जि. वाशिम
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:

भारतीय समाज विविध जातीमधे विभाजित झाला आहे. भारतात सहा हजारपेक्षा जास्त जाती आणि उपजाती आहेत. जाती प्रमाणेच विविध आदिवासी जमाती सुद्धा आहे. सुरवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे लोक म्हणजे आदिवासी होय. डॉ. व्हेरीयर इल्विन आणि ठक्कर बाप्पा यांनी " आदिवासीना ' aboriginal म्हणजे ' मुळचे निवासी' असे संबोधले आहे."[१] आदिवासी कोणाला म्हणायचे यासाठी 'आदिवासीची' ची व्याख्या पाहणे योग्य होईल.

**१)डॉ. रिव्हर्स :-** "जमात किवा आदिवासी हा एक सरळ साधा सामजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोली भाषेचा वापर करतात व युद्ध वैगेरे या सारख्या उद्देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करतात."[२]

**२)डॉ. डी.एन. मजुमदार :-** " जमात किवा आदिवासी समाज हा समान जीवन पद्धती असणारा, समान भाषा बोलणारा व व्यवहार, विवाह वैगरे बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा आणि एकाच भूप्रदेशावर वास्तव्ये करणाऱ्या कुटुंबाचे किवा कुटुंबसमूहाचे एकत्रीकरण आहे"[३]

मान्यवरांच्या वरील मतावरून आदिवासी म्हणजे रानावनात राहणारी, अप्रगत जीवन जगणारा भौतिक प्रगतीपासून वंचित असलेला, समान बोलीभाषा बोलणारा, समान जीवनपद्धती ने नटलेला व समान सांस्कृतिक जीवन जगणारा एकजिनसी मानव समूह म्हणजे 'आदिवासी' असे म्हणता येईल.

आदिवासी हे 'मूळ निवासी' असल्याचे म्हणजे त्यांचे जीवन हे अनेक कलाकुसरीनि युक्त आहे. चित्रकला, संगीतकला, विणकाम, नृत्यकला, गायनकला, शिल्पकला, यासोबतच कथा, लोकगीते, उखाणे, म्हणी यांनी आदिवासी जीवन समृद्ध आहे. परंपराप्रिय व एकाच ठिकाणी पूर्वीपासून वास्तवे असल्याने लोकवाङ्मयाचा अमूल्य ठेवा त्यांनी मौखिक परंपरेने जीवापाड जतन करून ठेवला आहे. आदिवासीचे लोकसाहित्य हे त्यांचा समाजाची सांस्कृतिक ठेव आहे. त्यंच्या सांकृतिक जीवनाचा शोध घेण्यासाठी त्यांचे लोकसाहित्य म्हणूनच अत्यंत महत्वाचे ठरते आहे. प्रस्तुत निबंधामध्ये आदिवासी जमतील 'कोलाम' जमातीच्या सांस्कृतिक वेगळेपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांच्या

**कोलाम:-**

भारतात महाराष्ट्र, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशात कोलाम जमातीचे लोक राहतात महाराष्ट्रात विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात सर्वात जास्त कोलामाची संख्या आहे १९८१ च्या जनगणनेनुसार ६५७०७ इतकी संख्या यवतमाळ जिल्ह्यात आहे. डॉ व्हेरीएर एल्विन यांच्या " मते कोलाम हे मूलनिवासी असल्याचा दावा करू शकतात"[४]

'कोलाम' हे द्रविड वंशाचे आहेत. दक्षिण भारतात निलगिरी पर्वतावरील ते मूलनिवासी असावेत असे काही अभ्यासक मानतात 'कोलाम' मधील 'कोल' या शब्दाचा संस्कृतमध्ये अर्थ 'डुक्कर' असा होतो. डुकराची शिकारकरण्यात ही जमात अतिशय वाकबगार असल्याने त्यांना 'कोलाम' किवा कोलावन किवा कोलावर या नावाने ओळखले जाते. यवतमाळ जिल्ह्यात इतर लोक कोलामांना 'नाईक' म्हणतात कोलाम लोक कोलामी बोलीभाषा बोलतात कोलामांची बोलीभाषा द्रविडीयन आहे.

कोलाम लोक जंगलामध्ये डोंगराजवळ किवा नदीच्या परिसरात बांबू व गवतापासून घरे बांधून वस्ती करतात. त्यांचं वस्तीला -पोड असे म्हणतात. कोलाम जमातीत पितृसत्ताक पद्धती असून वंश पित्याच्या नावाने चालतो. विभक्त कुटुंबपद्धती या जमातीत आहे.

**कोलाम सांस्कृतिक परंपरा:- सण - उत्सव**

**गाव बांधणी :-** गाव बांधणी हा कोलामांचा अत्यंत महत्त्वाचा सन आहे. सामूहिक स्तरावर हा सन साजरा होतो. रोग निवारण व अरिष्टापासून गावाचे संरक्षण करणे हा हेतू गाव बांधणी सणामागे आहे. हा सण साजरा करण्यासाठी दुसऱ्या कोलाम पोडातून घुसाडी(भगत) बोलाविल्या जातो. देवतांनी प्रसन्न होऊन गावाचे रक्षण करावे म्हणून देवी -देवतांची स्तुतीपर गीते कोलाम गातात उदा.

महुरता देवी तांदुंग वात्तीना
तांदुंग तोदा ?
बारा मयनीला पुंजा
तिनेंग वात्तीन !....
बारा मयनेला ख़ुशी
काकेंग वात्तीन !
आडुरा पिल्लाकुल इउरा पिल्लाकुल
तांदुंग कुलतेरा तांदुंग तोदा ?
सात्ती ओलेंग वात्तेव ! पृ १०४

या गीतातून माहूर देवीची आळवणी केली आहे. बारा महिन्यांनी ही देवी पूजा घ्यायला आली आहे पूजा आनंद लुटायला ही देवी आली आहे. गावातील बाया,पोरंबाळ गावबांधणीचा उत्सव बघायला जमली आहेत. गावाबांधणी उत्सवाच्या निमित्ताने पोडावरील सर्व कोलाम स्त्री-पुरुष एकत्र येतात . बायका- पोरांना या उत्सवात सहभागी होण्याचा अधिकार कोलाम जमातीत आहे. एप्रिल ते जून महिन्याच्या दरम्यान ‘मोराम’ देवीची स्थापना करून वस्तीभोवती रेषा काढून मंत्र-तंत्राच्या साहाय्याने भगताकडून गाव बांधून काढले जाते. या उत्सवात नृत्ये व नानाविध सोंगे काढून कार्यक्रमात रंगत भरली जाते.

कोलाममध्ये दसऱ्याचा सण विजयादशमीला मोठ्या प्रमाणात साजरा होतो. शामीच्या झाडावर बांधून ठेवलेल्या देवांची ते पूजा करतात. पूर्वी या दिवशी नरबळी देण्याची प्रथा होती आता पशू बळी देतात सन उत्सवात भक्तीगीते सुध्दा गायली जातात.

जल्मेंग बातना जामे

आउर काकनेर येणा भूल

एत्न्नेती किय्यत शोभी  लाद हरी- रामा कानेत पुव्व ||धृ||

हनुमाननेत आणि श्रीरामनेत,

ओकोदिये  भक्ती  |

आंडादि जालारुंग माहिती

नवल तोते आत्ती ||

वेडा आणि मुर्खा

सेरेंबिपे येना पोय्ये

गुरुबाक आणि ज्ञानेश्वरा

सामुत्ताक तो तेरे आवरे ||

तुका आणि चोखाक,

इवरून विसरलीताम यॆंड |

गाऊदी येना  ओलुर, आवरेत तत्वज्ञान भुलीलाद्येंडा| पृ १०४-१०५

(जन्मास येऊन आयुष्याचे भले करावयास शिका श्रीराम-कृष्ण-हरी हे बोल विसरू नका. त्यांनी केलेले सत्कृत्ये देखील ध्यानात ठेवा. हनुमान आणि श्रीराम एकच आहे. त्यांची भक्ती करा हे सर्व लोकांना माहित असूनही ते चुकतात व परमेश्वर व भक्तीला मुकतात.प्रपंच करून परमात्म्या कडे लक्ष दे. ज्ञानेश्वर, तुकोबा, चोखोबा ह्यांनी सांगितलेली तत्वे कधीही विसरू नका.)

वरील भक्तीतून वारकरी संप्रदायचे तत्वज्ञान कोलाम जमातीती विशेष महत्व असल्याचे दिसून येते. तरच राम-कृष्ण-हरी हा वारकरी संप्र्द्याचा मंत्र या जमातीत अंगीकारल्याचे स्पष्ट होते. कोलाम जमात अत्यंत श्रद्धाळू असल्याने परमेश्वराच्या पूजा-भक्ती बरोबर निसर्गालाही महत्व देते चंद्र-सूर्याची ते उपासना करतात. त्याचं जवळ ते मागणी करतात. चुकांचे प्रक्षालन करतात त्यासोबतच भिमायक, जयतूर आदि दैवतांची ते उपासना करतात,

'रे रेना रेना रे रेना, रेना रेंना रेंना रे रेना,

उरा देवी एन्नीवे देवी,
ईनुंग नारेल - शेंदूर |
उरा भिमायक एन्नीवे भिमाय्याक
ईनुंग पिल्लू पिचूक |
उरा जयतूर एन्नीवे जयतूर, ... (पृष्ठ - १०६)

(आमची चूक झाली तर तू सांग त्या चुकीबद्दल आम्ही तुला नैवदये देऊ तू आमची आई व आम्ही तुझी लेकर तुला नारळ - शेंदूर अर्पण करतो. तुला कोंबडीच पिल्लू अर्पण करतो. तू आमच्या वर प्रसन्न हो.)

कोलाम जमात ईश्वारास  मानणारी अत्यंत श्रद्धावान जमात आहे. तसेच कमालीचे अंधश्रद्धाळू सुद्धा आहे. जादुमंत्र, भूतपिशाच्च यावर त्यांचा विश्वास आहे. यासाठी देवतांना प्रसन्न करण्यासाठी प्राण्यांचा बळी देतात. धार्मिक विधीला या जमातीत अत्यंत महत्व आहे.

**कोलाम विवाह :-**

कोलाम जमातीमध्ये विभक्त कुटुंबपद्धती आहे. विवाहानंतर मुलगा आपल्या पत्नीसह वेगळ्या घरात राहतो. नवविवाहित जोड्प्यास विवाहनंतर प्रथम आपले घर उभे करावे लागते. विवाहानंतर पुढील सहजीवनाची सुरवात ज्या घरात होणार आहे. त्यासाठी काय करावे लागणार यांचे वर्णन खलील गीतातून व्यक्त होते.

रे रेना रेना रे रेना, रेना रेना रेना रे रेना,
तालत्ते गोरसा, बुजामत्ते गोलली,
च्यामे बायी खुटेल पुतेंगे
ताल्लते गोरसा बुजाम्मते गोलली,
किय्यत इपाटे चाम्ये बाटयी सिव्वाल पुतेंगे. (पृष्ठ ११०)

(जंगलात जाऊन सर्वप्रथम घरासाठी लागणारे खांब, आडव्या मायली, आणाव्या लागतील यांचे वर्णन या गीतात आहे.)

कोलाम जमातीत विवाहप्रसंगी गीत गाईले जाते यामध्ये वधूकडील स्त्रिया वराकडच्या स्रियांना आमची मुलगी किती चांगली आहे. व हुशार आहे. हे सांगतात.

आम्मे पिला काडकाद (आमची मुलगी )
आम्मे पिला कांडकाद, आम्ये पिला कांडकाद |
मोगराक नेते पुळकिशा, पुव्वबराबर कांडकाद | (पृष्ठ १०८)

आमची मुलगी मोगऱ्याच्या फुलासारखी नाजूक, कोमल तारुण्याने बहरलेली आणि आपल्या सुगंधाने मन मोहून टाकणारी आहे. अशी मुलीची स्तुती करतात तर वर मुलगा कसा वाईट आहे हे गीतातून व्यक्त करतात.

इम्मे बाला कांडकाद, इम्मे बाला कांडकाद |
शिशुकनेत खुटे किशा, खुटेबराबर कांडकान || (पृष्ठ १०९)
(तुमचा मुलगा खैराच्या झाडाच्या खुटासारखा ताठ, दृष्ट वृत्तीचा आहे.)

विवाह गीतातून मुलीच्या सौदर्याची तारीफ तर मुलाला दुषणे दिली जातात. मुलीच्या दृष्टीने मुलगा कमी दर्जाचा आहे. हे यामधून व्यक्त करायचे असते. विवाहानंतर घरामध्ये लागणाऱ्या इतर गोष्ठी किती महत्वाच्या आहेत. कारण इथून पुढील सहजीवनासाठी त्या आवश्यकच आहेत. व त्या कोठून- कोठून आणायच्या याचे वर्णन खालील गीतातून केले आहे.

'रे रेना रेना रे रेना, रेना रेना रेना र रेना.
येद्द मालेंग सेन्नामे बायी
येद्द मालेंग सेन्नामे ||
मंगलीता मालेंग सेन्नाम्य बायी,
मंगलीता मालेंगे तो देए दारा भाटारेता मालेंग
सेन्नामे बाय्यी भाटरेता मालेंग सेन्नामे | पृ १११

जंगलात दोघांनी मिळून जायचे मांगलीच्या जंगलातून मध, भाटारयाच्या जंगलातून डिंक अश्या प्रकारे ताडोबा, पासून ते मोठ्या महादेवाच्या जंगलापर्यंत जाऊन गृहपयोगी वस्तू आणायच्या याच्या सोबत महादेवाच्या डोंगरावर जाऊन पापक्षालन करून त्याचे दर्शन घेऊ असा एकमेकांच्या संगतीत सहजीवनाचा सुंदरप्रवास सुखकर करण्याचा मानस या गीतातून व्यक्त होतो. विवाहानंतर लागणाऱ्या इतर गोष्टीचे वर्णन बहुतांश कोलामी गीतातून आढळले. विवाहानंतर आपली हौस पुरवावी असा हट्ट पत्नी पतीकडे करते तेव्हा पती तिला विविध वचने देतो त्याचे हे गीत.

इंडीताव पिल्लाकुल येनाव मागवानुंग
इच्युटे सेवेंड दर कोतवा येडुंग
मासाल कुरतीन कारभाराल' (पृष्ठ ११४)

आजकालच्या मुली पतीला गुंडभर पाणी आणायला सांगतात पती बिचारा पाणी आणून देतो अशाप्रकारे काड्याची मोळी, कधी स्वंयपाक तर कधी बायकोचे अंग चोळावे लागते.

कोलाम जमातीमध्ये एकाविवाहाप्रमाणे बहुपत्नीत्वाची पद्धत देखील आहे. विधवा विवाह मान्यता आहे परंतु पतीच्या नातेवाईकाशी  ती विवाह करून शकत नाही. विवाह हा मुलीच्या घरी होतो. मुलीला भाऊ नसेल तर वराला घरजावई ठेवण्याची प्रथा आहे. मामेभाऊ, मामेबहीण यांचा विवाह होतो परंतु मावसबहीण - भाऊ यांचा विवाह निषिद्ध मानला जातो. पूर्वी या जमातीत अपहरण विवाहाची पद्धत होती ती आता फारशी आढळत नाहि. या जमातीत घस्फोटाची पद्धत फार साधी आहे. पत्नी पतीची वर्षभर वाट पाहते तो घ्यायला आला नाही वा येणार नाही असे वाटल्यास जात पंचायत समोर दोघेही दारूच्या पेल्यावर एक आडवी काडी ठेऊन जातात. ती काडी धरून पत्नी पतीस व पती पत्नीस ' तूं आजपासून माझा भाऊ-बहिण' आहेस असे म्हणून काडी मोडतात यास काडी मोड घेणे म्हणतात.

**कोलामांची पंचायत व्यवस्था :-**

कोलाम जमातीत जात पंचायत आहे. पंचायतीचे स्वतंत्र्य नियम आहे. ते अलिखित असून परंपरंगत आहेत. पंचायतीमध्ये विविध पदाधिकारी असतात. नेकून किवा नाईक, महाजन, कारभारी आणि घट (आमंत्रक) हे पदाधिकारी आहेत. न्यायदान सामुहिक निर्णयाने होते. नियमांचे उल्लंघन होत नाही. केल्यास जमाती बाहेर काढले जाते. जात पंचायतीत स्त्रियांचे अनैतिक वर्तन अतिशय गंभीर मानले जाते. मुलीस फासून पळून नेणे, स्त्रीने रखेली म्हणून राहणे इत्यादी गुन्हयाबद्दल २०० ते २५० रु दंड भाराव लागतो. अलीकडे या रकमेत वाढ झाली आहे. वाळीत टाकलेल्या कुटुंबास दंड भरुनच पुन्हा जमातीत घेतले जाते.

**कोलामांचे कूल :-**

कोलामांच्या कुलात देवतांच्या पुजनावरून कुलाचे चार प्रकार पडले आहेत. चारदेव, पाचदेव, सहादेव, व सातदेव अशी या कुलांची नावे आहेत. या प्रत्यकी कुलामध्ये समाविष्ठ होणाऱ्या कुलाची आडनावे निश्चित प्रकारची आहे.

१.चारदेव :- टेकाम, पाटोले, मडावी, मांगुर्ले

२. पचादेव :- भिवइकर, येलेके, लोणसावळी

३.सहादेव :- आत्राम, कसार, देवनारे, बिरकर

४.सातदेव :- किनारे, जांभे, जांभूळकर, माद्नी, सकराचुरे

सहा एका कुळातील सदस्य कुलबंधू असतात. त्यांचात एका कुलात विवाह होत नाही. परंतु सण- उत्सव जन्म- मृत्यू व इतर धर्मिक कार्यात ते सहभागी होतात.

**कोलामांचे विधी:-** कोलाम जमातीत बाळाच्या जन्मानंतर पाचव्या दिवशी नाव ठेवतात. पोळा किवा पोळ्याच्या महिन्यात जावळ काढतात. मृत्यूनंतर मृतकाला पुरतात. जाळीत नाहीत पुरल्या नंतर त्यावर वड्डा(ओटा) बांधतात. सुतक एका दिवसाचे तर काही कुटुंबात तीन किवा पाच दिवस पाळतात. अंगात येणे ,भूत काढणे, रोगराईतून बरे होण्यासाठी देवतांची पूजा भक्तांकडून केली जाते. पशुबळी ही पद्धत अस्तित्वात आहे अंधश्रद्धेतून बाहेर येण्यासाठी त्यांची मानसिक तयारी दिसत नाही लोकगीतातून व्यक्त झालेल्या ‘कोलाम’ जमातीच्या सांस्कृतिक जीवनाचा शोध होत असताना आजच्या प्रगत संस्कृतीपेक्षा कोलाम जमातीची सांस्कृतिक बैठक वेगळी आहे हे स्पष्ट होते. याच सोबत त्यांच्या सांस्कृतिक वेगळेपणा विषयी काही मते सहज मांडता येतात.

कोलाम ही जमत मूळ निवासी असल्याने त्यांनी आपल्या प्रथा -परंपरांना अत्यंत जीवापाड जपल्याने इतर संस्कृतीपेक्षा त्यांची जगण्याची रीत वेगळी आहे. आजही त्यांच्या सांस्कृतिक जीवनात फारसा बदल झालेला दिसत नाही. जन्म -मृत्यू , विवाह ,गावबांधणी या सारख्या विधी आजही तशास आहेत. सण - उत्सवांच्या प्रसंगी स्त्री पुरुषांना सहभागी होणे विशेषतः स्त्रियांना बरोबरीने संधी देणे आजच्या प्रगत समाजापेक्षाही त्यांची ही रीत अभिमानस्पद आहे. निसर्गाला देव मानणे त्याची पूजा करणे व त्या विषयी कृतज्ञता भाव व्यक्त करणे हे वैशिष्ट्य या जमातीचे आहे. श्रद्धा अंधश्रद्धा उपासना -विधी ,तंत्र-मंत्र या दृष्टीने ही जमात पारंपरिक आहे. यात बदल करण्याच्या मानसिक अवस्थेत ते आजही दिसत नाहीत परंतु स्त्रियांना स्वातंत्र्य , वैवाहिक सहजीवनात परस्परांवर विश्वास या सारखी वैशिष्टे ही प्रगत संस्कृतीलाही लाजवेल अशी आहे. आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वेगळेपणा

विषयी डॉ. विनायक तुमराम यांनी मांडलेले मत महत्त्वाचे ठरते. ते म्हणतात “आदिवासी समाज आपली प्राचीन परंपरा ,सामाजिक व सांस्कृतिक संचित टिकवून ठेवून नव्या युगाला संघर्ष करीत सामोरे जात आहे. त्यांचा व्यवसाय, त्यांची घरे घराची रचना, वेशभूषा, आचार - विचार, आहार- विहार चालीरीती, धर्मसंकल्प, देव- दैवत, उपासनापद्धती, रूढी, परंपरा श्रद्धा, समजुती, अज्ञान, अंधश्रधा, सन-उत्सव, कला व संगीत ह्या परंपरागत गोष्टी अजूनही त्यांच्या जीवनात आढळून येतात. या परंपरेबरोबर नवतेचा शिरकाव त्यांच्या दैनदिन जीवनात झाला असला तरी त्याच्या आदिम जीवनामागे नैसर्गिक आणि ऐतिहासिक स्वरूपाच्या सांस्कृतिक प्रेरणा आहे. म्हणून आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षर असेल पण तो असंस्कृत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याला स्वताची स्वतंत्र आणि अर्थपूर्ण संस्कृती आहे.”४

डॉ. तुकाराम ह्यांचे हे मत आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक वेगळेपणा सिद्ध करण्यास पुरेसे आहे. असे म्हणता येते. हाच निकष ‘कोलाम’ जमातीसह लागू असल्याने इतर प्रगत संस्कृतीपेक्षा व आदिवासिमधील इतर जमातीपेक्षा कोलामांची सांस्कृतिक जीवन शैली वेगळी आहे हे स्पष्ट होते.

## संदर्भ:

१. आदिवासी समाजाचे समाजशास्त्र - लेखक डॉ. प्रदीप आगलावे साईनाथ प्रकाशन नागपूर पृष्ठ १
२. तत्रेव पृष्ठ २
३. तत्रेव पृष्ठ ३
४. आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, डॉ. विनायक तुमराम पृष्ठ १

**टिप** :- कोलाम जमातीची गीते ही महाराष्ट्रतील आदिवासीचे लोकसाहित्य या डॉ. शैलजा देवगावकर यांच्या पुस्तकातून घेतली आहे. गीता खालील पृष्ठ क्रमांक हे वरील पुस्तकातील आहेत.